महाराष्ट्र शासन

विधी व न्याय विभाग

सन १९४९ चा मुंबई अधिनियम क्र. ११

# मुंबई शरीररचनाशास्त्र अधिनियम, १९४९

(दिनांक ३१ जुलै १९८५ पर्यंत सुधारित)

BOMBAY ACT No. XI OF 1949

# The Bombay Anatomy Act, 1949

(*As modified upto 31st July 1985*)

व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय आणि ग्रंथागार, नागपूर, यांच्याद्वारे भारतात मुद्रित आणि
संचालक, सरकारी मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र राज्य, मुंबई-४, यांच्याद्वारे प्रकाशित
१९८५

[ किंमत रु. १-०० ]

# मुंबई शरीररचनाशास्त्र अधिनियम, १९४९

अनुक्रमणिका


पृष्ठ

उद्देशिका ... १

कलमे.

१. संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ ... १

२. व्याख्या ... २

३. (वगळण्यात आले) ...

४. अधिकाऱ्यांना कलम ५ अन्वये काम करण्यास प्राधिकृत करण्याचा राज्य शासनाचा अधिकार. ... ३

५. कोणत्याही उपचारशास्त्रीय प्रयोजनासाठी किंवा शरीररचनाशास्त्रविषयक परीक्षेसाठी बेवारशी प्रेतांचा उपयोग करणे. ... ३

५-अ. प्रेतावर हक्क सांगणारी व्यक्ती जवळचा नातेवाईक आहे किंवा नाही याविषयी उद्भवलेली शंका किंवा विवाद अपमृत्यु निर्णेता किंवा कार्यकारी दंडाधिकारी यांच्याकडे पाठविणे आणि निर्णय होईतोपर्यंत प्रेत जपून ठेवणे. ... ४

५-ब. मृत व्यक्तीचे प्रेत किंवा प्रेताचा कोणताही भाग उपचारशास्त्रीय व इतर विवक्षित प्रयोजनासाठी वापरला जाण्यासाठी दान करणे. ... ४

५-क. प्रेत केवळ दफन किंवा दहन यासाठी दुसऱ्या व्यक्तीकडे सोपविण्यात येईल तेव्हा प्रेत किंवा त्याचा भाग हलवण्याचा प्राधिकार नसणे. ... ५

५-ड. प्रेत जेव्हा मान्यताप्राप्त परिसंस्थेत पडून असेल तेव्हा ते हलविण्याचा वगैरे प्राधिकार. ... ५

५-ई. मान्यताप्राप्त परिसंस्थांनी प्रेताबरोबर मृत्यूचे प्रमाणपत्र इ. स्वीकारणे. ... ५

५-फ. या अधिनियमाच्या सर्व किंवा कोणत्याही प्रयोजनासाठी ज्या ठिकाणी प्रेताची विल्हेवाट लावण्यात यावयाची असेल त्या ठिकाणाबाबत नोटीस. ... ६

६. शास्ती ... ६

७. सहाय्य क[illegible] हे पोलीस व इतर अधिकाऱ्यांचे कर्तव्य असणे ... ६

८. या अधिनियमान्वये काम करणाऱ्या व्यक्तीस संरक्षण ... ६

९. अधिकारी लोकसेवक असणे ... ७

१०. नियम ... ७

१०-अ. अधिनियमामुळे शवपरीक्षेस मनाई न होणे ... ७

१०-ब. व्यावृत्ती ... ७

११. निरसन व व्यावृत्ती ... ७

# सन १९४९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ११[1]

## [मुंबई शरीररचनाशास्त्र अधिनियम, १९४९.]*

[या अधिनियमास १३ एप्रिल १९४९ रोजी राज्यपालांची अनुमती मिळाली. ही अनुमती प्रथम **मुंबई शासन राजपत्र** भाग चारमध्ये दिनांक २२ एप्रिल १९४९ रोजी प्रसिद्ध करण्यात आली.]

या अधिनियमात पुढील आदेश व अधिनियम याद्वारे अनुकूलन, रूपभेद व सुधारणा करण्यात आल्या आहेत :—

विधि अनुकूलन आदेश, १९५०.

मुंबई विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९५६.

सन १९५७ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३३.

सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४४.

महाराष्ट्र विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६०.

सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३५ (१-९-१९७६)†

**[2][ उपचारशास्त्रीय प्रयोजनांकरिता किंवा ][3][ शरीररचनाशास्त्रविषयक परीक्षा व शवविच्छेदन यांसह, वैद्यकीय शिक्षणाकरिता किंवा संशोधनाकरिता ], रुग्णालयांना आणि वैद्यकीय व शैक्षणिक परि-संस्थांना मृत व्यक्तींची बेवारशी प्रेते पुरविण्यासाठी [4][ आणि एखाद्या व्यक्तीने, तिच्या मृत्यूनंतर द्यावयाच्या तिच्या शरीराचे किंवा शरीराच्या कोणत्याही भागाचे दान तिच्या मृत्यूपूर्वी करुन ठेवण्यासाठी] तरतूद करण्याबाबत अधिनियम.**

**ज्याअर्थी** [2][उपचारशास्त्रीय प्रयोजनांकरिता किंवा] [3][शरीररचनाशास्त्रविषयक परीक्षा व शवविच्छेदन यांसह, वैद्यकीय शिक्षणाकरिता किंवा संशोधनाकरिता], रुग्णालयांना आणि वैद्यकीय व शैक्षणिक परि-संस्थांना मृत व्यक्तींची बेवारशी प्रेते पुरविण्यासाठी [4][आणि एखाद्या व्यक्तीने तिच्या मृत्यूनंतर द्यावयाच्या तिच्या शरीराचे किंवा शरीराचा कोणत्याही भागाचे दान तिच्या मृत्यूपूर्वी करून ठेवण्यासाठी] तरतूद करणे इष्ट आहे; **त्याअर्थी**, याअन्वये पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ.

१. (१) या अधिनियमास मुंबई शरीररचनाशास्त्र अधिनियम, १९४९, असे म्हणावे.

[5][(२) तो संपूर्ण [6][महाराष्ट्र राज्यास] लागू आहे.]

(३) हे कलम तांबडतोब अंमलात येईल.

---

[1] उद्देश व कारणे यांच्या निवेदनासाठी मुंबई सरकारचे राजपत्र, १९४८, भाग ५, पृष्ठ ६५ पहा.

* हा अधिनियम सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४४ याच्या प्रारंभाच्या निकटपूर्वी मुंबई राज्याच्या ज्या भागास लागू नव्हता त्या भागास लागू करण्यात आला होता. (सन १९५९ चा मुंबई अधिनियम ४४, कलम २ पहा.)

† ही खूण अधिनियमाच्या प्रारंभाची तारीख दर्शविते.

[2] हे शब्द सन १९५७ चा मुंबई अधिनियम ३८, कलम ८ (अ) अन्वये समाविष्ट करण्यात आले.

[3] सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३५, कलम २ (२) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[4] वरील अधिनियमाच्या कलम २ (१) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[5] पोट-कलम (२) हे मूळ पोट-कलमाऐवजी सन १९५९ चा मुंबई अधिनियम ४४, कलम ३ (१) अन्वये दाखल करण्यात आले.

[6] "मुंबई राज्यास" या मजकुराऐवजी हा मजकूर महाराष्ट्र विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६० अन्वये दाखल करण्यात आला.

(४) [1][राज्य] शासनास, **शासकीय राजपत्रात** अधिसूचना प्रसिद्ध करून, अशा अधिसूचनेत निर्दिष्ट करण्यात येईल अशा तारखेस व अशा क्षेत्रात, या अधिनियमाच्या बाकीच्या तरतुदी अंमलात येतील असा निदेश देता येईल :

[[2]परंतु मुंबई शरीररचनाशास्त्र (व्याप्ती वाढविणे सुधारणा) अधिनियम, १९५९, याच्या प्रारंभाच्या तारखेस, [3][मुंबई राज्यांच्या] विदर्भ विभागांतील हैद्राबाद प्रदेशातील आणि सौराष्ट्र प्रदेशातील ज्या स्थानिक क्षेत्रात, यथास्थिति, मध्यप्रदेश शरीररचनाशास्त्र अधिनियम, १९५४, हैद्राबाद रोगचिकित्सा आणि शरीररचनाशास्त्र अधिनियम, १९५५, किंवा सौराष्ट्र शरीररचनाशास्त्र अधिनियम, १९५५, च्या तरतुदी अशा प्रारंभापूर्वी अंमलांत होत्या त्या क्षेत्रांत या अधिनियमाच्या बाकीच्या तरतुदी अंमलात येतील.] १९५९ चा मुंबई ४४. १९५४ चा म. प्र. १६. १९५५ चा है. अ. १०. १९५५ चा सौराष्ट्र ३२.

व्याख्या २. विषयात किंवा संदर्भात एतद्विरुद्ध काही नसल्यास, या अधिनियमात—

(१) "मान्यताप्राप्त संस्था" या संज्ञेचा अर्थ, [4][या अधिनियमाच्या सर्व किंवा कोणत्याही कारणाकरिता] [1][राज्य] शासनाने मान्यता दिलेले रुग्णालय अथवा वैद्यकीय किंवा शैक्षणिक परिसंस्था असा समजावा;

(२) "प्राधिकृत अधिकारी" या संज्ञेचा अर्थ, कलम ५ अन्वये काम करण्यास प्राधिकृत केलेला अधिकारी, असा समजावा ;

(३) "जवळचा नातेवाईक" या संज्ञेचा अर्थ, मृत व्यक्तीचा पुढील कोणताही नातेवाईक म्हणजे पत्नी, आई, पती, वडील, मुलगा, मुलगी, भाऊ व बहीण असा समजावा; व तीत—

(अ) पारंपरिक नात्याने तीन पर्यायांच्या आत व भिन्नशाखीय नात्याने सहा पर्यायांच्या आत पारंपरिक एकरक्तसंबंधाने किंवा एकरक्तशाखासंबंधाने, अथवा

(ब) मृत व्यक्तीशी किंवा या खंडात विनिर्देशपूर्वक नमूद केलेल्या कोणत्याही नातेवाईकाशी किंवा पूर्वोक्त पर्यायांच्या आतील कोणत्याही इतर नातेवाईकाशी झालेल्या विवाहाने, मृत व्यक्तीशी नाते असलेल्या कोणत्याही इतर व्यक्तीचा समावेश होतो.

**स्पष्टीकरण.**—"पारंपरिक एकरक्तसंबंध" व "एकरक्तशाखासंबंध" या शब्दप्रयोगांचा अर्थ, भारतीय उत्तराधिकार अधिनियम, १९२५, यात त्यांस जो अर्थ दिला असेल तोच असेल; १९२५ चा ३९.

(४) "विहित" म्हणजे या अधिनियामान्वये केलेल्या नियमांनी विहित केलेले;

(५) "बेवारशी प्रेत" या संज्ञेचा अर्थ, ज्या मृत व्यक्तीस कोणी जवळचा नातेवाईक नाही किंवा ज्याच्या प्रेतावर त्याच्या जवळच्या कोणत्याही नातेवाईकांनी विहित केलेल्या मुदतीत हक्क सांगितलेला नाही अशा व्यक्तीचे प्रेत, असा समजावा;

३. [जवळच्या नातेवाईकासंबंधी उद्भवलेली शंका किंवा विवाद अपमृत्युनिर्णेता किंवा अधिकृत प्राधिकारी यांच्याकडे पाठविणे] सन १९५९ चा मुंबई अधिनियम ४४, कलम ४ अन्वये वगळण्यात आले.

---

[1] "प्रांतिक" या शब्दाऐवजी हा शब्द विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये दाखल करण्यात आला.

[2] हे परंतुक सन १९५९ चा मुंबई अधिनियम ४४, कलम ३ (२) अन्वये दाखल केले.

[3] "मुंबई राज्याच्या" हा मजकूर महाराष्ट्र विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६० अन्वये पूर्वीच्याच स्वरूपात कायम ठेवण्यात आला.

[4] हा मजकूर सन १९५७ चा मुंबई अधिनियम ३३, कलम ८ (ब) अन्वये दाखल केला.

४. [१][राज्य] शासनास, **शासकीय राजपत्रांत** प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेद्वारे हा अधिनियम ज्या क्षेत्रात अंमलात आला असेल त्या क्षेत्रांसाठी किंवा त्याच्या कोणत्याही भागासाठी, कलम ५ अन्वये काम करण्यास एक किंवा अधिक अधिकाऱ्यांना प्राधिकृत करता येईल. अशा अधिकाऱ्याकडे उक्त कलम ५ अन्वये प्रतिवृत्त पाठविण्यात आले पाहिजे.

अधिकाऱ्यांना कलम ५ अन्वये काम करण्यास प्राधिकृत करण्याचा [१][राज्य] शासनाचा अधिकार.

५. (१) [१][राज्य] शासनाने किंवा स्थानिक प्राधिकरणाने स्थापन केलेल्या किंवा त्याच्यामध्ये निहित असलेल्या किंवा त्याने चालविलेल्या रुग्णालयात जिला औषधोपचार करण्यात येत असेल अशी व्यक्ती अशा रुग्णालयात मरण पावल्यास व तिच्या प्रेतावर कोणी हक्क न सांगितल्यास, अशा रुग्णालयाच्या प्रभारी प्राधिकाऱ्याने त्यासंबंधीचे प्रतिवृत्त शक्य तितक्या कमीत कमी वेळात प्राधिकृत अधिकाऱ्याकडे पाठविले पाहिजे; आणि त्यानंतर अशा अधिकाऱ्याने असे बेवारशी प्रेत [३][उपचार किंवा] शास्त्रीय कारणासाठी किंवा] [४][शरीररचनाशास्त्रविषयक परीक्षा व शवविच्छेदन यांसह, वैद्यकीय शिक्षणाच्या किंवा संशोधनाच्या प्रयोजनार्थ] मान्यताप्राप्त परिसंस्थेच्या प्रभारी प्राधिकाऱ्याच्या हवाली केले पाहिजे.

[२][कोणत्याही उपचार शास्त्रीय प्रयोजनांसाठी किंवा] शरीररचनाशास्त्रविषयक परीक्षेसाठी बेवारशी प्रेतांचा उपयोग करणे.

(२) पोट-कलम (१) मध्ये उल्लेख केलेल्या रुग्णालयाव्यतिरिक्त इतर रुग्णालयात किंवा तुरुंगात एखादी व्यक्ती मरण पावल्यास व तिच्या प्रेतावर कोणी हक्क न सांगितल्यास, असे रुग्णालय किंवा तुरुंगाच्या प्रभारी प्राधिकाऱ्याने त्यासंबंधीचे प्रतिवृत्त प्राधिकृत अधिकाऱ्याकडे शक्य तितक्या कमीत कमी वेळात पाठविले पाहिजे; आणि उक्त अधिकाऱ्याने असे बेवारशी प्रेत पोट-कलम (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या प्रयोजनांकरिता मान्यताप्राप्त परिसंस्थेच्या प्रभारी प्राधिकाऱ्याच्या हवाली केले पाहिजे.

(३) जर एखादी व्यक्ती एखाद्या क्षेत्रातील कोणत्याही सार्वजनिक जागी मरण पावली व अशा क्षेत्रात तिची कायमची राहण्याची जागा नसली आणि तिच्या प्रेतावर कोणी हक्क सांगितला नाही तर, प्राधिकृत अधिकाऱ्याने तिचे प्रेत ताब्यांत घेऊन ते पोट-कलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेल्या प्रयोजनांकरिता मान्यताप्राप्त परिसंस्थेच्या प्रभारी प्राधिकाऱ्यांच्या हवाली केले पाहिजे.

[५][(४) जेव्हा मृत्यूच्या कारणाविषयी कोणतीही शंका असेल किंवा अन्य कोणत्याही कारणास्तव
१८९८ प्राधिकृत अधिकाऱ्यास तसे करणे इष्ट वाटेल तेव्हा, त्याने बेवारशी प्रेत, फौजदारी प्रक्रिया संहिता,
चा ५. १८९८, *कलम १७४, यात उल्लेख केलेल्या पोलीस अधिकाऱ्याकडे पाठविले पाहिजे.]

---

[१] हा शब्द "प्रांतिक" या शब्दाऐवजी विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये दाखल करण्यात आला.

[२] हे शब्द सन १९५७ चा मुंबई अधिनियम ३३, कलम ८ (क) अन्वये समाविष्ट करण्यात आले.

[३] हे शब्द सन १९५७ चा मुंबई अधिनियम ३३, कलम ८ (क) अन्वये समाविष्ट करण्यात आले.

[४] मूळ मजकुराऐवजी हा मजकूर सन १९७५ चा महा. अधि. ३५, कलम ३ अन्वये दाखल केला.

[५] पोट-कलम (४) हे सन १९५९ चा मुंबई अधिनियम ४४, याच्या कलम ५ (१) अन्वये समाविष्ट करण्यात आले.

* आता फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २) पहा.

प्रेतावर हक्क सांगणारी व्यक्ती जवळचा नातेवाईक आहे किंवा नाही याविषयी उद्भवलेली शंका किंवा विवाद अपमृत्यु-निर्णेता किंवा कार्यकारी दंडाधिकारी यांच्याकडे पाठविणे आणि निणय होईतोपर्यंत प्रेत जपून ठेवणे.

[1][५-अ. (१) कलम ५ अन्वये प्रेतावर हक्क सांगणारी एखादी व्यक्ती मृत व्यक्तीचा जवळचा नातेवाईक आहे किंवा नाही याबाबत कोणतीही शंका किंवा विवाद उद्भवल्यास ती बाब, बृहन्मुंबईत अपमृत्यू निर्णेता अधिनियम, १८७१, अन्वये नेमलेला अपमृत्यू निर्णेता किंवा अपर अपमृत्यू निर्णेता यांच्याकडे व इतरत्र ती, कार्यकारी दंडाधिकारी, किंवा राज्य शासन याबाबतीत नेमील अशा अधिकाऱ्या-कडे पाठविली पाहिजे आणि त्याचा निर्णय अखेरचा व निर्णायक असेल. १८७१ चा ४.

(२) असा निर्णय होईतोपर्यंत, प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याने मृत व्यक्तीचे प्रेत कुजू नये म्हणून जपून ठेवण्यासाठी सर्व वाजवी काळजी घेतली पाहिजे व उपाय योजले पाहिजेत.]

मृत व्यक्तीचे प्रेत किंवा प्रेताचा कोणताही भाग उपचार-शास्त्रीय व इतर विवक्षित प्रयोजनांसाठी वापरला जाण्यासाठी दान करणे.

[2][५-ब. (१) कोणत्याही व्यक्तीने, आपल्या मृत्यूनंतर उपचारशास्त्रीय प्रयोजनार्थ किंवा शरीररचनाशास्त्रविषयक परीक्षा व शवविच्छेदन यांसह, वैद्यकीय शिक्षणाच्या किंवा संशोधनाच्या प्रयोजनार्थ आपले शव किंवा शवाचा कोणताही भाग मान्यता प्राप्त परिसंस्थेच्या प्रभारी अधिकाऱ्यास द्यावा, अशी कोणत्याही वेळी एकतर लेखी किंवा ज्यामुळे ती मरण पावली असेल अशा तिच्या शेवटच्या आजारात दोन किंवा अधिक साक्षीदारांच्या समक्ष तोंडी विनंती व्यक्त केली असेल तर, तिच्या, मृत्यूनंतर कायदेशीर-रीत्या तिचे प्रेत ताब्यात असणाऱ्या व्यक्तीस, नंतर अशी विनंती मागे घेण्यात आली होती, असे तिला सकारण वाटले नाही तर तिचे प्रेत किंवा प्रेताचा कोणताही भाग कोणत्याही मान्यताप्राप्त परिसंस्थेकडे तिच्या विनंतीनुसार वापर करण्यासाठी घेऊन जाण्यास प्राधिकृत करता येईल.

(२) मृत व्यक्तीचे प्रेत कायदेशीररीत्या ताब्यात असणाऱ्या व्यक्तीस,—

(अ) मृत व्यक्तीने, आपल्या मृत्यूनंतर आपल्या प्रेताचा किंवा प्रेताच्या कोणत्याही भागाचा उपयोग अशा रीतीने करण्यास आक्षेप घेतला होता व तिने असा आक्षेप मागे घेतला नव्हता, किंवा

(ब) प्रेताचा वापर अशा रीतीने करण्यात मृत व्यक्तीच्या कोणत्याही जवळच्या नातेवाईकाने आक्षेप घेतला आहे,

असे सकारण वाटत नसेल तर, अशा व्यक्तीस, पोट-कलम (१) च्या तरतुदींना बाध न देता, पोट-कलम (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या प्रयोजनार्थ वापरण्यासाठी मृताचे पूर्ण प्रेत किंवा प्रेताचा कोणताही भाग घेऊन जाण्यास प्राधिकृत करता येईल..

(३) या कलमाच्या पोट-कलम (४) व (५) यांच्या तरतुदींच्या अधीन, या कलमास अनुसरून दिलेल्या प्राधिकारपत्रानुसार पूर्ण प्रेत किंवा प्रेताचा कोणताही भाग घेऊन जाणे व त्याचा वापर करणे हे कायदेशीर असेल, व प्रेत किंवा प्रेताचा कोणताही भाग घेऊन जाणे व या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ त्याचा वापर करणे यांसाठी प्राधिकार पत्र हा पुरेसा आधार असेल.

---

[1] कलम ५-अ हे सन १९५९ चा मुंबई अधिनियम ४४, कलम ६ अन्वये समाविष्ट करण्यात आले.

[2] कलमे ५ ब ते ५ फ, सन १९७५ चा महाराष्ट्र अधि. क्रमांक ३५, कलम ४ अन्वये समाविष्ट करण्यात आली.

(४) कोणत्याही परिस्थितीत कोणत्याही व्यक्तीचे प्रेत किंवा त्या प्रेताचा कोणताही भाग पोट-कलम (१) मध्ये बिनिर्दिष्ट केलेल्या प्रयोजनापैकी कोणत्याही प्रयोजनासाठी, अशी व्यक्ती जेथे मरण पावली असेल अशा कोणत्याही ठिकाणापासून—अशा व्यक्तीच्या मृत्यूच्या वेळेपासून अठ्ठेचाळीस तासांनंतरची असेल अशा मुदतीच्या आत, तसेच अशा मृत्यूच्या वेळेपासून मोजावयाच्या चोवीस तासांनंतरची असेल अशी प्रेत हलविण्याच्या इराद्याची नोटीस अपमृत्यु निर्णेता किंवा अपर अपमृत्युनिर्णेता किंवा कार्यकारी दंडाधिकारी यांस दिली जाईपर्यंत, तसेच प्रेत हलविण्यापूर्वी, अशा व्यक्तीस ज्या रीतीने मृत्यू आला ती रीत नमूद करणाऱ्या प्रमाणपत्रावर, ज्यामध्ये तिला मृत्यू आला अशा आजारात अशा व्यक्तीवर ज्याने उपचार केले अशा नोंदणीकृत वैद्यक व्यवसायीने किंवा अशा आजारात अशा व्यक्तीवर अशा कोणत्याही वैद्यक व्यवसायीने उपचार केलेले नसतील तर, अशा व्यक्तीच्या मृत्यूनंतर तिच्या प्रेताची पाहणी करण्यासाठी ज्या नोंदणीकृत वैद्यक व्यवसायीस बोलावण्यात येईल व जो आपल्या संपूर्ण माहितीनुसार व विश्वासानुसार मृत्यूची रीत व कारण नमूद करील, परंतु प्रेत हलवल्यानंतर जो पूर्वोक्त प्रयोजनापैकी कोणत्याही प्रयोजनासाठी शवाचा वापर करण्याशी संबंधित नसेल, अशा नोंदणीकृत वैद्यक व्यवसायीने, सही केलेली असल्याशिवाय, हलवता कामा नये आणि प्रेत अशा रीतीने हलवण्यात आल्यावर पूर्वोक्त प्रयोजनापैकी कोणत्याही प्रयोजनासाठी ते स्वीकारणाऱ्या मान्यताप्राप्त परिसंस्थेच्या प्रभारी प्राधिकाऱ्यास अशा शवासह असे प्रमाणपत्रसुद्धा देण्यात येईल.

(५) त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्याच्या तरतुदीनुसार, अशा प्रेताचे मरणान्वेषण किंवा त्याची मरणोत्तर तपासणी करणे आवश्यक आहे, असे, प्रेत कायदेशीररीत्या ताब्यात असणाऱ्या व्यक्तीस सकारण वाटले तर, अशा कायद्यान्वये मरणान्वेषण किंवा मरणोत्तर तपासणी करण्याबाबत आदेश देण्याचा अधिकार सोपवलेल्या प्राधिकाऱ्याची संमती असेल त्याव्यतिरिक्त, या कलमान्वये प्रेत किंवा त्याचा कोणताही भाग हलवण्यास प्राधिकारपत्र देण्यात येणार नाही.

**५-क.** केवळ प्रेताचे दफन किंवा दहन करण्याच्या प्रयोजनांसाठीच प्रत सोपवण्यात आलेल्या व्यक्तीकडून कोणत्याही प्रेताच्या बाबतीत, ते प्रेत किंवा त्याचा कोणताही भाग या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ, हलवण्यासंबंधी कोणतेही प्राधिकारपत्र कलम **५-ब** अन्वये, देण्यात येणार नाही.

प्रेत, केवळ दफन किंवा दहन, यासाठी दुसऱ्या व्यक्तीकडे सोपविण्यात येईल तेव्हा, प्रेत किंवा त्याचा भाग हलवण्याचा प्राधिकार नसणे.

**५-ड.** कोणत्याही रुग्णालयात, शुश्रुषालयात किंवा इतर परिसंस्थेत पडून असलेल्या शवाच्या बाबतीत, कलम **५-ब** अन्वये ते शव किंवा त्याचा कोणताही भाग हलविण्याविषयी प्राधिकारपत्र त्या रुग्णालयावर, शुश्रुषालयावर किंवा परिसंस्थेवर नियंत्रण असणाऱ्या किंवा त्याची व्यवस्था पाहणाऱ्या व्यक्तीच्या वतीने त्या प्रयोजनासाठी प्रथम नमूद केलेल्या व्यक्तीने नेमलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याला किंवा व्यक्तीला देता येईल.

प्रेत जेव्हा मान्यताप्राप्त परिसंस्थेत पडून असेल तेव्हा ते हलविण्याचा वगैरे प्राधिकार.

**५-ई.** मान्यताप्राप्त परिसंस्थेच्या प्रभारी प्राधिकाऱ्याने या अधिनियमाच्या सर्व किंवा कोणत्याही प्रयोजनासाठी प्रेत मिळाल्यानंतर, त्या प्रेताबरोबरच पूर्वोक्त प्रमाणपत्राची मागणी केली पाहिजे व ते मिळविले पाहिजे आणि प्रेत अशा रीतीने हलवल्यानंतर पुढील चोवीस तासांच्या आत, बृहन्मुंबईत अपमृत्यु-निर्णेता अधिनियम, १८७१ अन्वये नेमलेल्या अपमृत्युनिर्णेत्याकडे किंवा अपर अपमृत्युनिर्णेत्याकडे आणि इतर ठिकाणी कार्यकारी दंडाधिकाऱ्याकडे किंवा राज्य शासनाकडून त्याबाबतीत नेमण्यात येईल अशा कोणत्याही अधिकाऱ्याकडे, त्या प्रमाणपत्राची प्रत आणि ज्या दिवशी, ज्यावेळी आणि ज्याच्याकडून प्रेत मिळाले इ.

१८७१ चा ४.

मान्यताप्राप्त परिसंस्थांनी प्रेताबरोबर मृत्युचे प्रमाणपत्र स्विकारणे.

तो दिवस, ती वेळ आणि त्या व्यक्तीचे नाव, तसेच मृत्यूची तारीख व ठिकाण, मृत व्यक्ती स्त्री किंवा पुरुष आहे ते आणि (त्यावेळी माहीत असेल तेथवर) मृताचे नाव आणि आडनाव, वय आणि अशी व्यक्ती शेवटी ज्या ठिकाणी राहत होती ते ठिकाण ह्या गोष्टी नमूद केलेले विवरणसुद्धा पाठवले पाहिजे. आणि त्याच्याशी संबंधित असलेल्या पूर्वोक्त तपशीलाच्या आणि प्रेतासह मिळालेल्या प्रमाणपत्राची मान्य प्राधिकारपत्राच्या प्रतीची, अशा प्राधिकाऱ्याकडून या प्रयोजनासाठी ठेवल्या जाणाऱ्या नोंदवहीत नोंद केली पाहिजे किंवा अशी नोंद करवण्याची व्यवस्था केली पाहिजे आणि जे हा अपमृत्यु निर्णेता किंवा अपर अपमृत्यु निर्णेता किंवा यथास्थिति कार्यकारी दंडाधिकारी किंवा पूर्वोक्त कोणताही अधिकारी तसे करण्यास फर्मावील तेव्हा अशी नोंदवही प्रस्तुत केली पाहिजे.

**या अधिनियमाच्या सर्व किंवा कोणत्याही प्रयोजनासाठी वापर करून झाल्यानंतर ज्या ठिकाणी प्रेताची विल्हेवाट लावण्यात यावयाची असेल त्या ठिकाणाबाबत नोटीस.**

५-फ. या अधिनियमाच्या कोणत्याही प्रयोजनासाठी पूर्वी सांगितल्याप्रमाणे हलवलेले प्रेत, अशा रीतीने हलवण्यापूर्वी सुबक शवपेटिकेत किंवा हलक्या शवपेटीत किंवा मृत शरीर ठेवण्याच्या इतर कोणत्याही साधनात ठेवले पाहिजे आणि त्यातून ते हलवले पाहिजे आणि ते पूर्वी सांगितल्याप्रमाणे हलवणाऱ्या किंवा हलविण्याची व्यवस्था करणाऱ्या व्यक्तीने या अधिनियमाच्या कोणत्याही प्रयोजनासाठी अशा प्रेताचा वापर करून झाल्यानंतर त्या प्रेताचे औचित्यपूर्ण रीतीने, पवित्र भूमीवर किंवा जिचे प्रेत अशा रीतीने हलवले गेले असेल ती व्यक्ती ज्या धर्ममताची असेल त्या धर्माच्या व्यक्तींकरिता असलेल्या कोणत्याही सार्वजनिक दहन भूमीवर किंवा दफनभूमीवर, दहन केले जाईल किंवा दफन केले जाईल अशी तरतूद केली पाहिजे आणि अशा दहनाचे, किंवा दफनाचे प्रमाणपत्र बृहन्मुंबईत अपमृत्यु निर्णेत्याकडे आणि इतर कार्यकारी दंडाधिकाऱ्याकडे किंवा त्या प्रयोजनासाठी राज्य शासनाने नेमलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याकडे पूर्वी सांगितल्याप्रमाणे असे प्रेत मिळाल्याच्या तारखेनंतर सहा आठवड्यांच्या आत, पाठविले पाहिजे]

**शास्ती.**

६. या अधिनियमान्वये दिलेल्या परवानगीव्यतिरिक्त इतर प्रकारची जी कोणी व्यक्ती [1][प्रेताची] विल्हेवाट लावील किंवा विल्हेवाट लावण्यास प्रोत्साहन देईल किंवा मान्यताप्राप्त परिसंस्थेच्या कोणत्याही प्रभारी प्राधिकाऱ्यास असे प्रेत [2][या अधिनियमासाठी] हवाली करण्याच्या, ताब्यात घेण्याच्या, हलविण्याच्या किंवा वापरण्याच्या कामी अडथळा करील तिला सिद्धापराध ठरविण्यात आले असता पाचशे रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या दंडाची शिक्षा होईल.

**सहाय्य करणे हे पोलीस व इतर अधिकाऱ्यांचे कर्तव्य असणे.**

[3][७. पोलीस, वैद्यकीय आणि सार्वजनिक आरोग्य विभागाचे सर्व अधिकारी व कर्मचारी, स्थानिक प्राधिकाऱ्याच्या सेवेत असलेले सर्व अधिकारी व कर्मचारी आणि सर्व ग्राम अधिकारी व कर्मचारी हे, या अधिनियमान्वये प्राधिकृत केलेल्या प्राधिकाऱ्यांस व अधिकाऱ्यांस, या अधिनियमान्वयेची त्यांची कर्तव्ये पार पाडण्याच्या कामी सहाय्य करण्याकरिता सर्व वाजवी उपाययोजना करण्यास बांधलेले असतील.]

**या अधिनियमान्वये काम करणाऱ्या व्यक्तीस संरक्षण.**

८. या अधिनियमान्वये सद्भावनापूर्वक केलेल्या किंवा करण्याचा इरादा असलेल्या अशा कोणत्याही कृत्याबद्दल कोणत्याही व्यक्तीविरुद्ध कोणताही दावा, खटला किंवा इतर कायदेशीर कारवाई करता येणार नाही.

---

[1] "बेवारशी प्रेताची" या मजकुराऐवजी हा मजकूर सन १९७५ महाराष्ट्र अधिनियम ३५, कलम ५ (१) अन्वये दाखल करण्यात आला.

[2] "ह्या अधिनियमात विनिर्दिष्ट केलेल्या कारणासाठी" या मजकुराऐवजी हा मजकूर वरील अधिनियमाच्या कलम ५ (२) अन्वये दाखल करण्यात आला.

[3] मूळ कलमाऐवजी कलम ७ हे सन १९५९ चा मुंबई अधिनियम ४४, कलम ७ अन्वये दाखल करण्यात आले.

१८६० चा ९. या अधिनियमान्वये काम करण्यासाठी नेमलेले किंवा प्राधिकृत केलेले सर्व अधिकारी हे, अधिकारी
४५. भारतीय दंड संहिता, कलम २१ च्या अर्थानुसार लोकसेवक आहेत असे समजले पाहिजे. लोकसेवक असणे.

१०. (१) [१][राज्य] शासनास, शासकीय राजपत्रात प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेद्वारे, या अधिनियमाचे उद्देश पार पाडण्याकरिता नियम करता येतील. नियम.

(२) पोट-कलम (१) च्या तरतुदीच्या सर्वसाधारणतेस बाध येऊ न देता, अशा नियमात, ज्या मुदतीत मृत व्यक्तीच्या प्रेतावर जवळच्या नातेवाईकाने हक्क सांगितला पाहिजे ती मुदत विहित करता येईल.

[२][१०-अ. या अधिनियमातील कोणत्याही गोष्टीचा अर्थ, राज्यात त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यान्वये आवश्यक असलेल्या किंवा करावयाचा निदेश दिलेल्या कोणत्याही शवाच्या कोणत्याही शवपरीक्षेस लागू होते किंवा तिला मनाई होते, असा करता येणार नाही. अधिनियमामुळे शवपरीक्षेस मनाई न होणे.

१०-ब. (१) या अधिनियमातील कोणत्याही गोष्टीचा अर्थ, हा अधिनियम पारित झाला नसता तर कोणत्याही मृत व्यक्तीच्या प्रेताचा अगर त्याच्या कोणत्याही भागाचा जो वापर कायदेशीर ठरला असता तो बेकायदेशीर ठरतो, असा करता येणार नाही. व्यावृत्ती.

(२) या अधिनियमाच्या तरतुदीस अधीन राहून प्रेत किंवा प्रेताचा कोणताही भाग हलविण्यासाठी
१८६० चा दिलेले प्राधिकारपत्र हे भारतीय दंड संहितेच्या कलम २९७ च्या तरतुदीचे उल्लंघन असल्याचे मानण्यात
४५. येणार नाही.]

[३][११. मुंबई शरीररचनाशास्त्र (व्याप्ती वाढविण्याबाबत आणि सुधारण्याबाबत) अधिनियम, निरसन व
१९५९ चा १९५९ (ज्याचा या कलमात पुढे "उक्त अधिनियम" असा उल्लेख केलेला आहे) हा अंमलात आल्यानंतर व्यावृत्ती.
मुंबई ४४. पुढील अधिनियम निरसित होतील :—

(१) [४][मुंबई राज्याच्या] विदर्भ विभागास लागू असलेला मध्यप्रदेश शरीररचनाशास्त्र अधि-
१९५४ चा म. प्र. १६. नियम, १९५४.

(२) [४][मुंबई राज्याच्या] हैदराबाद विभागास लागू असलेला हैदराबाद रोगचिकित्सा आणि
१९५५ चा हैद्रा. १०. शरीररचनाशास्त्र अधिनियम, १९५५, आणि

१९५५ चा सौराष्ट्र ३२. (३) सौराष्ट्र शरीररचनाशास्त्र अधिनियम, १९५५ :

परंतु उपरोक्त अधिनियम अशा रीतीने निरसित करण्यात आल्यामुळे—

(अ) अशा रीतीने निरसित केलेल्या कोणत्याही अधिनियमाचा पूर्वीचा अंमल ;

(ब) अशा रीतीने निरसित केलेल्या कोणत्याही अधिनियमान्वये संपादन केलेला किंवा प्राप्त झालेला कोणताही हक्क किंवा विशेषाधिकार किंवा पत्करलेले किंवा प्राप्त झालेले आबंधन किंवा दायित्व ;

---

[१] हा शब्द "प्रांतिक" या शब्दाऐवजी विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये दाखल करण्यात आला.

[२] कलमे १०-अ आणि १०-ब ही सन १९७५ चा महा. अधि. ३५, कलम ६ अन्वये समाविष्ट करण्यात आली.

[३] कलम ११, हे सन १९५९ चा मुंबई अधिनियम ४४, याच्या कलम ८ अन्वये जादा दाखल करण्यात आले.

[४] "मुंबई राज्याच्या" हा मजकूर महाराष्ट्र विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६० अन्वये पूर्वीच्याच स्वरूपात कायम ठेवण्यात आला.

(क) अशा रीतीने निरसित केलेल्या कोणत्याही अधिनियमाविरुद्ध केलेल्या कोणत्याही अपराधाच्या संबंधात झालेली कोणतीही शास्ती; किंवा

(ड) उपरोक्त असा कोणताही हक्क, विशेषाधिकार, आबंधन, दायित्व किंवा शास्ती याबाबतची कोणतीही चौकशी, कायदेशीर कारवाई किंवा उपाययोजना ;

यास बाध येणार नाही आणि जणू उक्त अधिनियम पारित झाला नव्हता असे समजून अशी कोणतीही चौकशी, कायदेशीर कारवाई किंवा उपाययोजना करता येईल, चालू ठेवता येईल किंवा अंमलात आणता येईल आणि अशी कोणतीही शास्ती करता येईल :

तसेच, मागील परंतुकास अधीन राहून अशा अधिनियमान्वये किंवा तदनुसार नेमलेला किंवा प्राधिकृत केलेला कोणताही अधिकारी, किंवा मान्यता दिलेली संस्था, किंवा केलेला उल्लेख हा, जेथवर या अधिनियमाशी विसंगत नसेल तेथवर, या अधिनियमाच्या तत्सम तरतुदीन्वये नेमलेला किंवा प्राधिकृत केलेला अधिकारी, मान्यता दिलेली संस्था किंवा केलेला उल्लेख आहे असे समजले पाहिजे आणि या गोष्टी या अधिनियमान्वये केलेल्या कोणत्याही गोष्टीद्वारे किंवा केलेल्या कोणत्याही उपाययोजनेद्वारे अधिक्रमित करण्यात आल्या नसतील तर व अधिक्रमित करण्यात येईपर्यंत, त्याप्रमाणे अंमलात राहतील :

आणखी असे की, या अधिनियमान्वये केलेले व उक्त अधिनियम अंमलात येण्याच्या तारखेच्या निकटपूर्वी अंमलात असलेले नियम हे या अधिनियमान्वये केलेल्या कोणत्याही गोष्टीच्या द्वारे अधिक्रमित करण्यात आले नाहीत तर व अधिक्रमित करण्यात येईपर्यंत, संपूर्ण राज्याच्या संबंधात, या अधिनियमान्वये केलेले नियम आहेत असे समजले पाहिजे.]

(यथार्थ अनुवाद)

**न. ब. पाटील,**
भाषा संचालक, महाराष्ट्र राज्य.

शामुना—ए-६०१—भासंमुं-९-८५-८३५-पी. सी. ४*